## एकत्रित नि. ५ व नि. ३३ वर आदेश

वादीने प्रस्तुत कामी नि. ५ अर्जाप्रमाणे प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा न्यायप्रविष्ठ काळात दावा मिळकतीत काणेतेही बांधकाम करु नये अथवा विहिरीचे बांधकाम करु नये तसेच अन्य तत्सम कोणतेही बांधकाम करु नये यासाठी तात्पुरता मनाई आदेशाची मागणी केली आहे. तसेच नि. ३३ चे अर्जानुसार प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीत चि—याचे केलेले पक्के बांधकाम तसेच त्यामध्ये टाकलेली माती व भराव स्वखर्चाने काढून दावा मिळकतीत दावा दाखल तारखेस ज्या स्वरुपात होती त्या स्वरुपात आणणेविषयी आज्ञार्थी ताकीदीची मागणी केली आहे.

२. **वादींचा अर्जाची थोडक्यात हकीगत खालीलप्रमाणे :—**

वादीने प्रस्तुत दावा मौजे — पडेल, तालुका — देवगड येथील सर्व्हे क्र. ५५ हि.क्र. २/१ या मिळकतीबाबत निरंतर मनाईसाइी दाखल केला आहे. दावा मिळकत वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ३३ यांची समाईक मालकी वहिवाटीची मिळकत असून त्यांचेमध्ये अदयाप हद्दीमेरेनिशी वाटप झालेले नाही. सदर मिळकतीकडे प्रतिवादी क्र. १ व २ यांचा काडीचाही संबंध नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ व २ हे संगनमत व जबरदस्तीने जेसीबीच्या सहाय्याने खोदकाम करुन विहिरीचे बांधकाम करीत आहेत. तसेच त्यांनी दावा मिळकतीत घराचे बांधकाम सुरु केले आहे. त्याबाबत वादीने त्यांचेकडे विचारणा केली असता प्रतिवादींनी दावा मिळकतीत घराचे बांधकाम करणार व कब्जा करणार अशी धमकी दिली. त्यामुळे वादींनी नि. ५ चा अर्ज दाखल केला आहे. वादीचे नि. ३३ मधील कथनानुसार दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी हजर झालेनंतर नि. ५ चे अर्जावरती म्हणणे देईपर्यंत दावा मिळकतीत कोणतेही बांधकाम करणार नाही असे त्यांनी हमीपत्र न्यायालयात लिहून दिले. त्यानंतर दरम्यानचे काळात वादी त्याचे वैयक्तिक कामासाठी बाहेरगांवी गेल्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीत काही सहहिस्सेदारांना व त्याच्या कुटूंबियांना हाताशी धरुन

दावा मिळकतीत पुर्वी मारलेल्या खोदकामाचे ठिकाणी पक्के बांधकाम करण्यास सुरवात केली. तसेच त्याबाबत वादींनी विचारणा करता बांधकाम करणारच अशी धमकी दिली. सदर प्रतिवादींच्या कृत्यामुळे दावा मिळकतीचे मुळ स्वरुपात बदल होवून दावा मिळकतीला  तसेच वादीचे घरास धोका निर्माण होणार आहे. तसेच वादीचे पैशाचे स्वरुपात भरुन न येणारे असे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादींच्या विरुध्द तात्पुरता मनाई आदेश तसेच आज्ञार्थी ताकीदीचा आदेश देण्यात यावा.

**३.** प्रतिवादी क्र. १व २ यांनी आजरोजी नि. ३७ येथे त्यांची कैफियत तसेच नि. ५ व नि. ३३ चे अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे कथनाप्रमाणे वादी स्वच्छ हाताने व प्रामाणिक हेतूने न्यायालयासमोर आलेला नाही. सदर प्रतिवादींनी दावा मिळकतीत कोणतेही अतिक्रमण करुन खोदकाम केलेले नाही अगर विहिरीचे बांधकाम केलेले नाही. वस्तुतः प्रतिवादी क्र. १व २ हे वादी व इतर प्रतिवादींच्या वंशावळीतील आहेत. त्याबाबतची वंशावळ त्यांनी कैफियतसोबत दिली आहे. सदर प्रतिवादी हे वंशावळीमधील नमूद दामाजी याचे पश्चात नकुबाई हिचे वारस आहेत. त्ंयामुळे त्यांचा देखील त्या मिळकतीमध्ये हिस्सा आहे. परंतू गांव कादगोपत्री केवळ दामाजी यांचे नांव लागले व त्याचे पश्चात शिवराम याचे नांव लागले आणि त्याचे पश्चात सदाशिवचे एकटयाचे नांव लागले आहे. प्रतिवादी क्र. १ व २ हे कोणत्याही कारणास्तव दावा मिळकतीमध्ये गेलेले नाही तसेच त्यांनी कोणतेही बांधकाम पुर्वीही केलेले नव्हते अगर आताही केलेले नाही. तसेच सदर प्रतिवादींनी लिहून दिलेल्या हमीपत्राप्रमाणे ते दावा मिळकतीत कोणत्याही प्रकारचे बांधकाम अथवा कोणत्याही प्रकारे वहिवाट करीत नाहीत. याउलट प्रतिवादीना विनाकारण खर्चात पडावे लागले आहे. वादीने त्याने अर्जात केलेल्या विनंतीनुसार न्यायालयाकडून त्यास कोणतीही दाद मागण्याचा अधिकार येत नाही. त्यामुळे वादींचे अर्ज नामंजूर करण्यात यावेत.

**४.** वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या परस्पर विरोधी कथनावरुन नि. ५ व नि. ३३ अर्जांच्या निर्णयाकरीता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात त्यावरती खालील नमुद कारणांसह निष्कर्ष नोंदविण्यात येतात.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादीस सकृतदर्शनी दावा आहे काय ? | .... | होकारार्थी |
| २. | न्यायाचा तौलनिक कल कोणाच्या बाजुने आहे ? | .... | वादीच्या बाजूने |
| ३. | तुर्तातुर्त मनाई आदेश न दिल्यास कोणाचे नुकसान संभवते ? | .... | वादीचे |
| ४. | आदेश कोणता ? | .... | नि. ५ चा अर्ज मंजुर करण्यात आला. नि. ३३ चा अर्ज निकाली ठेवला. |

## —: कारणमिमांसा :—

**५.** वादीचे दोन्ही अर्ज वाचले. त्यावरील प्रतिवादी क्र. १ व २ यांचेतर्फे नि. ३६ येथे दाखल म्हणणे वाचले. तसेच उभयपक्षकारांमार्फत दाव्याचे कामी दाखल केलेले कागदपत्रांचे अवलोकन केले.

**६.** वादीतर्फे विधिज्ञ श्री.एम.एस.काळे यांचे युक्तीवादानुसार प्रतिवादी क्र. १ व २ यांचा दावा मिळकतीकडे कोणताही हक्कसंबंध नाही. दावा मिळकतीचा ७/१२ उतारा पाहता देखील त्यांचे नांवची नोंद नाही. प्रतिवादींनी दावा मिळकतीमधील सहहिस्सेदार सदाशिव शिवराम ठुकरुल याचे संम्मतीपत्राआधारे दोन गुंठे क्षेत्रात घर बांधकामाची परवानगी ग्रामपंचायतीकडे मागितली आहे. वस्तुतः दावा मिळकत कोणत्याही कायदेशीर मार्गाने प्रतिवादी क्र. १ व २ यांना तबदिल झालेली नाही. दावा मिळकतीचे क्षेत्र विचारात घेता सदाशिव शिवराम ठुकरुल यांस दोन गुंठे क्षेत्राबाबत संम्मतीपत्र देण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही. प्रतिवादींनी सुरु केलेले बांधकाम हे अनाधिकाराचे असून त्यांचे बांधकामामुळे वादीच्या घरास धोका निर्माण झाला आहे. तसेच त्यांनी दाव्याचे कामी हजर झालेनंतर त्यांनी

नि. ५ चे अर्जास म्हणणे देईपर्यंत कोणतेही बांधकाम दावा मिळकतीत करणार नाही असे न्यायालयासमोर लिहून दिले असतांना देखील बेकायदेशीररित्या व विनापरवानगीने तसेच सहहिस्सेदारांचे विनासंम्मतीने बांधकाम चालूच ठेवले आहे. प्रतिवादींच्या हया कृत्यामुळे वादीस त्याचे न्याय हक्कापासून मुकावे लागणार आहे. त्यांमुळे वादीचे दोन्ही अर्ज मंजूर करण्यात यावेत. त्यांनी आपले युक्तीवादाचे पुष्ठयर्थ *स्टेट ऑफ राजस्थान व इतर वि. श्रीमती सोहनीदेवी आणि इतर, एआयआर १९९९ राजस्थान १२९* या न्यायनिर्णयाचा अधिकार घेतला आहे.

७. प्रतिवादी क्र. १ व २ यांचे तर्फे विधिज्ञ श्री.आर.एस.राणे यांनी विधिज्ञ श्री.गुमास्ते यांचे अधिकारपत्रावरुन युक्तीवाद केला. त्यांचे युक्तीवादानुसार प्रतिवादी क्र. १व २ हे वादी व प्रतिवादीच्या कुटूंबाचे वंशावळीमधील असून त्यांचा देखील दावा मिळकतीमध्ये हक्कसंबंध आहे. सदर प्रतिवादींनी दावा मिळकतीत कोणतेही तथाकथित बांधकाम केलेले नाही. दावा मिळकतीमध्ये चालू असलेले तथाकथित बाधंकामाकडे सदर प्रतिवादींचा कोणताही हक्कसंबंध नाही. सदरचे बांधकाम कोणाचे आहे हे शाबीत करण्याची जबाबदारी वादीची आहे. प्रतिवादींनी ग्रामपंचायतीकडे बांधकामाबाबत परवानगी मागितली असली, तरी ग्रामपचांयतीने सदर प्रतिवादींना बांधकाम परवागनी नाकारली असल्याने प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम केलेले नाही. त्यामुळे वादीस सदर प्रतिवादी विरुध्द कोणतीही दाद मागण्याचा व मिळण्याचा अधिकार नाही. सबब वादीचे दोन्ही अर्ज नामंजूर करण्यात यावेत.

८. **मुद्दा क्र. १ ते ३ बाबत :—**

वादीने प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये जबरीने व बेकायदेशीरपणे अतिक्रमण करुन केलेले खोदकाम व विहिरीचे बांधकाम बुजवून देवून दावा मिळकत पूर्व करुन दयावी अशा अज्ञार्थी ताकीदीची मागणी केली आहे. तसेच सदर प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये घराचे, विहिरीचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु अथवा करवू नये अशी

निरंतर मनाईची मागणी व वैकल्पिकरित्या कब्जाची मागणी केली आहे. वादीने त्याचे दाव्यातील कथनांचे पृष्ठयर्थ व अर्जातील कथनांच्या पुष्ठयर्थ शपथपत्र दाखल केले आहे. वादीने नि. ४ येथे दाखल केलेला दावा मिळकतीचा ७/१२ उतारा पाहता त्यामध्ये वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ३३ यांच्या नावांची नोंद असल्याचे दिसून येते. सदर ७/१२ पत्रकी प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या नावच्या नोंदी नाहीत. वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत त्याची व प्रतिवादी क्र. ३ ते ३३ यांची समाईक असून, त्याकडे प्रतिवादी क्र. १ व २ यांचा काही हक्कसंबंध नाही. याउलट प्रतिवादी क्र. १ व २ यांनी ते वादी व अन्य प्रतिवादींच्या वंशावळीमधीलच असल्याने त्यांना दावा मिळकतीमध्ये हक्कसंबंध असल्याचा बचाव घेतला आहे. सदर प्रतिवादींचा दावा मिळकतीमध्ये हक्कसंबंध आहे असे दर्शविण्यासाठी सदर प्रतिवादींनी त्यांचे कैफियतसोबत वंशावळ दिली आहे. सदर वंशावळीनुसार नारायण याचा मुलगा दामाजी याची मुलगी नकुबाई हिचा प्रतिवादी क्र. १ हा मुलगा आहे. आजरोजी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नि. ४१ येथे दाखल केलेला वारस प्रकरणाच्या नोंदवहीचा उतारा पाहता नकुबाई ही दामाजीची मुलगी असल्याचे दिसून येते. सदरचा एकमेव कागदपत्री पुराव्याव्यतिरिक्त प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये त्याचा हक्कसंबंध आहे असे दर्शविण्यासाठी कोणतोही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही.

**९.** दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये त्याचा वारसा हक्काने हक्कसंबंध असल्याचे कथन केले आहे. तसेच त्यांचा बचाव पाहता त्यांनी दावा मिळकतीमधील बांधकामाशी त्यांचा काही हक्कसंबंध नाही व त्यांनी कोणतेही बांधकाम केलेली नाही असा पवित्रा घेतला आहे. वस्तुतः वादीने नि. ३८ सोबत अ.क्र. १ ते ३ येथे दाखल कागदपत्रे पाहता, प्रतिवादी क्र. २ याने ग्रामपंचायत पडेल यांचेकडे सदाशिव शिवराम ठुकरुल यांच्या मालकीच्या जागेमध्ये म्हणजेच दावा मिळकतीमध्ये दोन गुंठे क्षेत्रात घर बांधण्यास त्याच्या

संम्मतीपत्राआधारे परवानगी मागितल्याचे दिसून येते. सदरच्या कागदपत्रांबाबत प्रतिवादींनी त्यांच्या बचावामध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही. सदाशिव शिवराम ठुकरुल हा दावा मिळकतीमधील सहहिस्सेदार असल्याचे ७/१२ उता—यावरुन दिसून येत असले तरी त्यास दावा मिळकतीमध्ये २ गुंठे क्षेत्राची मालकी आहे, असा कोणताही कागदोपत्री पुरावा देखील प्रतिवादींनी सादर केलेला नाही. वस्तुतः दावा मिळकत ही समाईक असल्याचे व तिचे वाटप झालेले नाही या बाबी प्रतिवादींनी स्पष्टपणे नाकारलेल्या नाहीत. मुळतः दावा मिळकतीचे एकूण क्षेत्र ४. ५ गुंठे एवढे असून दावा मिळकतीमध्ये अन्य सहहिस्सेदार असतानां सदाशिव ठुकरुल याने प्रतिवादी क्र. २ यास कोणत्या कागदपत्राआधारे २ गुंठे क्षेत्राचे संम्मतीपत्र लिहून दिले हे स्पष्टपण होत नाही. तसेच दावा मिळकत ही कायदेशीररित्या प्रतिवादी क्र. २ यास तबदील झाल्याचे देखील दिसून येत नाही.

**१०.** प्रतिवादी क्र. १ व २ हे दावा मिळकतीमध्ये हक्कसंबंध उपस्थित करत आहेत. त्यांनी दावा मिळकतीमध्ये चालू असलेल्या बांधकामाशी त्यांचा कोणताही संबंध नाही असे कथन केले असले, तरी वादींनी दाखल केलेल्या कागदपत्रे पाहता प्रतिवादींनी ग्रामपंचायतीकडे घर बांधणेसाठी परवानगी मागितल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे वादीने दावा दाखल करतेवेळी नि. ४ सोबत अ.क्र. २ येथे दाखल केलेली छायाचित्रे पाहता, त्यामध्ये खोदकाम केलेले दिसून येते. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दाव्याचे कामी हजर झालेनंतर नि. २२ प्रमाणे ताकीद अर्जावर म्हणणे देईपर्यंत दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम करणार नाही असे शपथेवरती लिहून दिले आहे. अशी परिस्थिती असतांना देखील वादींनी नि. ३५/१ येथे दाखल केलेली छायाचित्रे पाहता दावा मिळकतीमध्ये बांधकाम चालू असल्याचे स्पष्ट होते. प्रतिवादी जरी सदर बांधकामाशी त्यांचा कोणताही हक्कसंबंध नसल्याचे कथन करत, असलेतरी त्यांनी सदर बांधकाम कोण करत आहे त्याबाबत कोणतीही कथने त्यांचे कैफियतमध्ये केलेली नाहीत. वादी हा शपथेवरती सदरचे बांधकाम हे प्रतिवादींचे असल्याचे कथन करतो तसेच त्याचे पृष्ठयर्थ वादीने

ग्रामपंचायतीकडील कागदपत्रे दाखल केली आहेत. यावरुनही दावा मिळकतीमधील बांधकाम हे प्रतिवादी क्र. १ व २ हे अनाधिकाराने व बेकायदेशीररित्या त्यांनी न्यायालयासमोर लिहून दिलेले नि. २२ चे शपथपत्राचे बाहेर जाऊन करीत असल्याचे स्पष्ट होते.

**११.** दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ व २ हे हक्कसंबंध असल्याचे कथन करत असलेतरी, त्यांनी दावा मिळकतीमध्ये चालू असलेले बांधकाम हे त्यांचे अनाधिकाराचे कृत्य आहे. त्यांनी ग्रामपंचायतीकडे मागितलेली परवानगी व त्यांचे कैफियत व म्हणणेमधील केलेली कथने ही एकमेकांशी परस्पर विरोधी अशी आहेत. सदर प्रतिवादींनी ग्रामपंचायतीकडे परवानगी मागतेवेळी दावा मिळकतीमधील एका सहहिस्सेदाराच्या संम्मतीपत्राआधारे त्याचे मिळकतीत बांधकाम करण्याची परवानगी मागितली आहे. वस्तुतः दावा मिळकत ही कायदेशिररित्या तबदिल झाल्याशिवाय सदर प्रतिवादींना कोणताही हक्क दावा मिळकतीबाबत प्रस्थापित करता येणार नाही. त्यांनी न्यायालयासमोर हमीपत्र ( नि. २२ ) लिहून दिले असतांना देखील दावा मिळकतीमध्ये बांधकाम चालू ठेवले हे एक बेकायदेशीर कृत्य आहे. दावा मिळकतीमधील प्रतिवादींचे हे कृत्य चालू राहिल्यास, तसेच त्यांनी दावा मिळकतीमध्ये घराचे बांधकाम पुर्ण केल्यास वादी व त्याच्या हिस्सेदारांच्या विरुध्द दावा मिळकतीचे वाटप लादले जाण्याची शक्यता आहे. वादीचे अर्जातील कथने ही त्याने दाखल केलेली कागदपत्रे व छायाचित्राआधारे प्रथमदर्शनी शाबीत होतात. वादी हा दावा मिळकतीमधील हिस्सेदार असून दावा मिळकतीत प्रतिवादींचे चालू असलेले बांधकाम हे वादीच्या घराचे लगत चालू असून त्यामुळे वादीच्या घरास धोका संभवतो ही देखील शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे न्यायाचा तैलनिक कल देखील वादीच्या बाजूने आहे. सर्वांत महत्वाची बाब म्हणजे प्रातिवादी क्र. १व २ यांनी दावा न्यायप्रविष्ठ असतांना तसेच नि. ५ चे अर्जावरती म्हणणे देईपर्यंत दावा मिळकतीत कोणतेही बांधकाम

करणार नाही असे लिहून दिले असतांना देखील अनाधिकाराने व बेकायदेशीररित्या आज अर्जास म्हणणे दाखल करणेपुर्वीच दावा मिळकतीमध्ये बांधकाम करुन दावा मिळकतीचे स्वरुप बदलल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे वादीतर्फे दाखल मा. उच्च न्यायालयाचे निर्णयामधील अभिमत या दाव्यास लागू होते. या सर्व बाबी विचारात घेता वादीचे न्यायहक्काचे संरक्षण करणे गरजेचे आहे. वादीने त्यास दावा सकृतदर्शी असल्याचे शाबीत केले आहे. तसेच न्यायाचा तैलनिक कल देखील त्याच्या बाजूने आहे. त्याचे हक्कामध्ये मनाई आदेश न दिल्यास त्याचे नुकसान संभवते. सबब, मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होय असा देण्यात येतो व मुद्दा क्र. २ व ३ चा निष्कर्ष वादीच्या हक्कामध्ये देण्यात येतो.

१२. **मुद्दा क्र. ४ बाबत** :—

प्रस्तुत कामी वादीने नि. ५ अर्जानुसार प्रतिवादींनी दावा मिळकतीत विहिरीचे अथवा घराचे बांधकाम करु नये असा निरंतर मनाई आदेश मागितला आहे. त्याचबरोबर नि. ३३ चे अर्जानुसार प्रतिवादींनी दाव्याचे कामी हजर झालेनंतर दावा मिळकती केलेले बांधकाम स्वखर्चाने काढून घ्यावे अशी मागणी केली आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये त्यांचा हक्कसंबंध असल्याचा वाद उपस्थित केला आहे. वादीची दाव्यातील मागणी पाहता त्याची प्राथमिक मागणी आज्ञार्थी ताकीदीची आहे. तसेच अदयापपर्यंत प्रतिवादीचे दावा मिळकतीमधील घराचे बांधकाम पुर्ण झालेले नाही. दावा दाखल करतेवेळी दावा मिळकतीमध्ये खोदकाम केलेले होते व त्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी बांधकाम चालू ठेवले आहे असे वादीने प्रथमदर्शनी शाबीत केले आहे. सदय परिस्थितीत वादीने दाखल केलेल्या छायाचित्रावरुन दावा मिळकतीमधील बांधकाम हे चौथ—यापर्यंत आले असल्याचे दिसून येते. या सर्व बाबीं विचारात घेता प्रतिवादी क्र. १ व २ यांना दावा मिळकतीमध्ये त्यांनी चालू केलेले घराचे बांधकाम सद्य स्थितीच्या पुढे करु नये असा तात्पुरता मनाई आदेश देणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. वादीने जरी आज्ञार्थी ताकीदीची मागणी केली असली, तरी सदय स्थितीमध्ये दावा मिळकतीमध्ये असलेल्या बांधकामामुळे वादीच्या वहिवाटीस कोणताही धोका पोहचत

नाही. तसेच दाव्याचे स्वरुप विचारात घेता वादी मागणी करतो त्याप्रमाणे आज्ञार्थी ताकीदीचा आदेश तुर्त देणे उचित नाही. सबब, मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्षाचे अनुषंगाने मुद्दा क्र. ४ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

—: **आदेश** :—

१. वादीचा नि. ५ चा अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो. तसेच नि. ३३ चा अर्ज खालील आदेशास अनुसरुन निकाली करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये दाव्याचे अंतिम निर्णयापर्यंत स्वत: अगर अन्य इसमांमार्फत तसेच त्यांचेवतीने नोकर चाकर अथवा अन्य कोणाही मार्फत दावा मिळकतीमध्ये चालू केलेले घराचे व विहीरीचे बांधकाम सद्य स्थितीच्या बाहेर जाऊन म्हणजेच चौथ—याचे पुढे करु नये अथवा करवू नये असा तात्पुरता मनाई आदेश त्यांचेविरुध्द देण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र. १ व २ यांना असाही मनाई आदेश देण्यात येतो की, त्यांनी दाव्याचे अंतिम निर्णयापर्यंत दावा मिळकतीमध्ये यापुढे कोणतेही खोदकाम करु नये अथवा विहीरीचे कोणतेही बांधकाम करु नये अगर दावा मिळकतीच्या स्वरुपात कोणताही बदल करु नये अथवा करवू नये असा तात्पुरता मनाई आदेश देण्यात येतो.

४. प्रस्तुत अर्जांचा खर्च अंतिम खर्चाच्या आकडयात समाविष्ठ करण्यात यावा.

देवगड
दि. २२/०३/२०१६

**( कमलेश का.माने )**
दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) देवगड